नमुना दोन

ग्राम:-
दूरध्वनी : ०२५७-२२२९४८७
ई-मेल: ssa_zpjalgaon@yahoo.com
जावक क्र. शिक्षण आर.टी.ई/आर.आर/ 21 /2026 दिनांक 4 - 8 - 2026

जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय शिक्षण विभाग (प्राथ), जिल्हा परिषद, जळगांव
(जिल्हा / राज्यांचे नाव):- जळगांव (महाराष्ट्र)
क्रमांक:27031602215 दिनांक 4 - 8 - 2026
व्यवस्थापक :-**पासम पासम वंदामी पद्मावती मुक्ती बहुउद्देशीय फाउंडेशन जळगाव तालुका जिल्हा जळगाव**

विषय :-बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम ४ अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत...

आपल्या दिनांक ०८/१०/२०२५ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार शाळेची केलेली तपासणी या आधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. जळगांव दिनांक **०१/०४/२०२५** पासून दिनांक **३१/०३/२०२८** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इ. १ ली ते इ. १२ वी स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावर (सीबीएसई इंग्रजी माध्यम)** करिता **वर्धमान युनिव्हर्स अकादमी सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूल सावखेडा तालुका जिल्हा जळगाव** (शाळेचे नांव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.:-

१] मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२] बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.

३] शाळानजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४] परिच्छेद 3 निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम१२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५] संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६] कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही. तसेच शाळा सोडण्याबाबत विनंती अर्ज केल्यास दाखला कोणत्याही कारणासाठी रोखून ठेवता येणार नाही.

७] शाळेतप्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.त्यांनाप्रवेशनाकारतायेणारनाही

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षांच्या काळ [illegible]

PRINCIPAL
VARDHAMAN UNIVERSE ACADEMY
CBSE ENGLISH SCHOOL
150/2,Savkheda Sivar,Girna
Pumping Road,Jalgaon.(M.S.)

MANAGER
VARDHAMAN UNIVERSE ACADEMY
CBSE ENGLISH SCHOOL
150/2,Savkheda Sivar,Girna
Pumping Road,Jalgaon.(M.S.)

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८] शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करेल, पाठ्यपुस्तक व गणवेश विशिष्ट ठिकाण अथवा दुकानातून घेण्याबाबत सक्ती करणार नाही.

९] शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०] शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ
- एकूण बांधकाम क्षेत्र
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ
- वर्गखोल्यांची संख्या
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली
- मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा.
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर.
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडा विषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.

११] मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२] शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३] शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४] शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५] शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखाविवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

१६] तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक **RTE 0109104** असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७] शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८] संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९] जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

२०] शासनस्तरावरून प्राप्तनिर्देशांचे मुख्याध्यापकयांनी विहित मुदतीत कार्यवाही अथवा अनुपालन करणे बंधनकारक असेल तसेच शासन निर्णय १३/०५/२०२५ चे ते १०० टक्के अनुपालन करण्याच्या आधीन राहून तसेच गटशिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी यांनी दिलेल्या अहवालावरून सदरची मान्यता देण्यात येत आहे

शिक्षणाधिकारी (प्राथ)

जिल्हा परिषद, जळगांव.

PRINCIPAL
VARDHAMAN UNIVERSE ACADEMY
CBSE ENGLISH SCHOOL
150/2,Savkheda Sivar,Girna
Pumping Road,Jalgaon.(M.S.)

MANAGER
VARDHAMAN UNIVERSE ACADEMY
CBSE ENGLISH SCHOOL
150/2,Savkheda Sivar,Girna
Pumping Road,Jalgaon.(M.S.)